# शिक्षण प्रसारक मंडळीचे

# टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे ३०

## वाचन प्रेरणा दिन अहवाल

दि. १५/१०/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता डॉ. वा. ना. दांडेकर सभागृह, टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे येथे भारतरत्न भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. दीपक चव्हाण आणि प्राध्यापक तसेच विद्यार्थी यांनी भारतरत्न भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्प अर्पण केले.

बी. एड. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी भारतरत्न भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या लेखणीने सिद्ध अशा "बियॉंड २०२०" आणि "असे घडवा तुमचे भविष्य" या पुस्तकांचे अभिवाचन करण्यात आले.

कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. चंद्रहास सोनपेठकर यांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी वाचनाची बदलती साधने, वाचनाचे प्रकार, भारतरत्न भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा युवकांना संदेश इत्यादी पैलूंवर प्रकाश टाकला.

अध्यक्षीय समापनपार भाषणात प्रा. डॉ. दीपक चव्हाण यांनी वाचनाची आवश्यकता, वाचनाचे मानसिक आरोग्यासंबंधित लाभ, पुस्तके उपलब्ध करून देणाऱ्या विविध वेबसाईट, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात वाचनाचे योगदान, एक शिक्षक म्हणून कार्य करताना वाचनाची गरज, भारतरत्न भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए.

पी. जे. अब्दुल कलाम यांचे राष्ट्र उभारणी आणि विकासासाठीचे विचार व कार्य या पैलूंवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. एड. छात्राध्यापक श्री अंकुर केंद्रे यांनी केले. पुस्तक अभिवाचनात बी. एड. छात्राध्यापक, विद्यार्थी संसद सचिव श्री गोविंद बॉबिलवाड, श्री शुभम जगताप इत्यादी यांनी सहभाग घेतला.

या प्रसंगी महाविद्यालाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

स्थळ: पुणे

दि. १५/१०/२०२२

कार्यक्रम समन्वयक

डॉ. चंद्रहास सोनपेठकर

TILAK COLLEGE OF EDUCATION PUNE-30
ID. NO. PU/PN/Edn./009, 1941

प्राचार्य

डॉ. राधिका इनामदार

PRINCIPAL
Tilak College of Education
Pune-411030.

